**नि. क्र.४८** पुढे सुरु          नि. दि. दावा क्रमांक **५८१/२०१९**

**प्रभावती वि. अयोध्याबाई**

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. ०३**

नाव – बालाजी पिता विश्वनाथ निकम,

वय – ६२ वर्षे, धंदा –शेती,

रा. मोगरगा, ता. औसा, जि. लातूर.

**उलटतपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. यु. बी. पाटील यांच्यामार्फत–**

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, वादींचे विवाह हे सन १९८० ते १९९० च्या दरम्यान झाले आहे. अंकुश चांदुरे मयत होवुन साधारण तीस वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.१८ मधील २० आर जमीन ही माणिक याने बालाजी लकडे यास विकली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमीन बालाजीला विकली त्या दरम्यान आयोध्याबाईच्या मुलींचे विवाह झाले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माणिक हयात असे पर्यंत शेतीचा कारभार माणिक पाहत असे. हे म्हणणे खरे आहे की, माणिक चांदुरे यांनी आयोध्याबाईला दावा मिळकतीतील ४४ आर जमीन नाममात्र खरेदीखताने विकली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माणिक याने आयोध्याबाईच्या जबरदस्तीमुळे सदरचे खरेदीखत तिच्या हक्कात करुन दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आयोध्याबाईला जमीन खरेदीसाठी दीड लाख रुपये दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आयोध्याबाईने तिचे सोने नाणे विकुन उर्वरीत दीड लाख रुपयांचा भरणा केला आहे.

**०५.** हे म्हणणे खरे नाही की, विहीरीतला हिस्सा आणि दावा मिळकतीपैकी ४४ आर जमीनचा विक्रीचा ठराव झाला नाही, पैसे दिले नाहीत अथवा ताबा देखील दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या कुटूंबाला कोणताही वैद्यकीय खर्च, खाजगी खर्च अथवा कायदेशीर गरज निर्माण झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी प्रभावती आणि तिच्या आई व बहिणीला जमीन द्यावी लागु नये म्हणुन खोटे खरेदीखत तयार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आयोध्याबाई ही दावा मिळकतीपैकी ४४ आर जमीनीची मालक व ताबेदार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बहिणींना मदत करण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण,

फेरतपास नाही.

**श्र. नि. स्वीकृत,**

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.07.17 15:51:02 +0530

**( श्री. आवटे पी. पी. )**

**दिनांक – १७/०७/२०२६**          **सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, औसा.**